SWRNA RAJHANS

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

*Swrna Rajhans*

खाकी मधला... देव

राज्य पोलिस सहकार्य उपक्रम

*State Police Cooperation Program*

करितो रक्षण चित्त देही आणि मन।
लावी जिवाचीच बाजी उभा मृत्यू असे ठाव॥

कर्तव्य शिरोमणी, राष्ट्र हेची माय बाप।
संसार सुखाचा कधी मनी नाही भाव॥

करी जनाची सेवा सहे ऊन वारा पावसाळा।
लोका नाही कौतुक सुख दुःख भोगे किती जीव॥

जना शोधून पहावा कधी **खाकी मधला देव**॥।


संपर्क

स्वर्ण श्री. रणजित (राज) दिपक रणदिवे

संस्थापक-संचालक-राष्ट्रीय अध्यक्ष

स्वर्ण राजहंस-स्टुडंट्स वेलफेअर सोसायटी (चॅरिटेबल ट्रस्ट)

8097950229 | Web : swrnarajhanscharitabletrust.org


वन्दे मातरम्

# खाकी मधला देव

प्रिय मित्रांनो!

वाढत्या लोकसंख्ये बरोबर वाढती गुन्हेगारी, असामाजिक तत्वांद्वारे होणारे असामाजिक कृत्ये, सण-उत्सवांचे बंदोबस्त, दहशतवाद, आतंकवादी हल्ले, सामाजिक प्रसार माध्यमांचा गैर वापर, वाढती गर्दी या व अशा अनेक कारणांमुळे पोलीस यंत्रणांवर सामाजिक सुरक्षेची जबाबदारी आणि ताण दिवसे दिवस वाढत आहे.

त्यामुळे **'Help Us to Help You'** या पोलीस दलाच्या घोष वाक्यास अनुसरुन आज समाजातील प्रत्येक दक्ष नागरिकाने स्वत:च्या सामाजिक जबाबदारीचे भान ठेऊन सदैव सतर्क व जागरुक राहून पोलिसांचे डोळे आणि कान होणे आणि सामाजिक सुरक्षेत पोलीस यंत्रणांना सहकार्य करणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यासाठी सर्वात आधी पोलीस यंत्रणा व सर्व सामान्य जनता यांच्यातील सुसंवाद आणि संपर्क वाढणे अनिवार्य आहे. म्हणूनच आपण सर्वांनी एकत्र येऊन पोलीसांच्यावतीने तेही पोलिसांच्या सहकार्य, सहभाग व मार्गदर्शना नुसार संस्थेद्वारे चालवण्यात येणाऱ्या पोलीस दलाशी संबधीत विविध सामाजिक विषयांवरील उपक्रमात सहभागी होऊन समाज प्रबोधन करण्यासाठी आणि त्याद्वारे पोलीस यंत्रणा व सर्व सामान्य जनता यांच्यातील सुसंवाद, संपर्क आणि एकमेकांतील विश्वास वाढवण्यासाठी पोलीस यंत्रणांना सहकार्य केले पाहिजे. जेणेकरुन पोलीस यंत्रणा त्यांचे कार्य व कर्तव्य समाजिक सहकार्याने अधिक प्रभावी पणे व अतिशय परिणामकारकरित्या पूर्ण करु शकतील.

पोलीसांचे असमान्य कार्य व कर्तृत्व यांची जाणीव तरुण पिढीच्या मनावर बिंबवण्यासाठी आणि प्रत्येक विद्यार्थी, तरुण व सामान्य व्यक्तींमध्ये एक जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन पोलीसांच्या असामान्य कार्य व कर्तृत्वाची ओळख करुन घेणे आणि त्या खाकी वर्दी मध्ये एक सामान्य सरकारी अधिकारीच नव्हे तर तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या संरक्षणासाठी अहोरात्र झटणारा आणि वेळ पडल्यास स्वत:चा जीव धोक्यात टाकणारा साक्षात **'खाकी मधला देव'** च आपल्या मध्ये वावरत आहे हे जाणून घेणे गरजेचे आहे. तरच पोलीस यंत्रणांच्या प्रती असलेले आपल्या मनातील प्रेम, मान-सन्मान, आपुलकी व आदर अजूनच वाढेल.

चला तर मग, पोलीस यंत्रणा आणि सर्व सामान्य नागरिक यांच्यातील दुवा होण्यासाठी 'स्वर्ण राजहंस-पोलीस सहकार्य समिती' मध्ये 'स्वर्ण राजहंस-पोलीस सहकारी' म्हणून सहभागी होऊया आणि पोलीसांचे डोळे व कान होऊन पोलीस दलाशी संबधीत विविध सामाजिक विषयांवर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाज प्रबोधन करुन अतिशय अनोख्या पध्दतीने देश सेवा करुया!!